
दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ
www.lokrakshanay.com  epaper.lokrakshanay.com  dainiklokrakshanay@gmail.com  + 91 97023 86118
●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२९६ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, मंगळवार, १६ एप्रिल २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

# ठाण्याचा पारा चढला !
## वाढत्या उष्णतेने अंगाची लाहीलाही; तापमान ४१.६ अंशवर



■ ठाणे, विशाल कारंडे :

हवामान खात्याने पुढील काही दिवस तापमानात वाढ होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्याची अनुभूती ठाण्यात सोमवारपासूनच जाणवू लागली. सोमवारी ठाणे शहरातील तापमानात वाढ होवून पारा ४१.६ अंश सेल्सियसवर पोहोचला होता. वाढलेल्या तापमानामुळे ठाणेकरांच्या अंगाची लाहीलाही होवू लागली होती. तसेच पुढील काही दिवस उष्णतेचा पारा वाढणार असल्याने नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. प्रादेशिक हवामान विभागाने रविवारी पुढील पाच दिवसांसाठी तापमानाचा अंदाज जारी केला. कोकण विभागात सोमवार ते बुधवार या कालावधीत कमाल तापमानाचा पारा ३ ते ४ अंशांनी वाढून, उष्णता निर्देशांक ४० ते ५० अंशांदरम्यान जाणवू शकेल, असेही स्पष्ट केले. आर्द्रता आणि उष्णता यामुळे प्रत्यक्ष तापमानापेक्षा तापमानाची जाणीव अधिक होण्याची शक्यता वर्तविण्यात आली होती. सोमवारी सकाळी ११ नंतर वातावरणात उष्णता वाढण्यास सुरुवात झाली होती. त्यात हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजाची अनुभूती ठाणेकरांना आली. सोमवार ठाणे जिल्ह्यासाठी सर्वात उष्ण दिवस ठरला. जिल्ह्यातील मुरबाड शहरात सर्वाधिक ४३.२ तर बदलापूर शहरात सर्वाधिक ४२.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. ते संपूर्ण जिल्ह्यात सरासरी ४१ अंश सेल्सिअस तापमान होते. खासगी हवामान अभ्यासकांनी याची नोंद केली. सकाळपासूनच उन्हाच्या झळा लागत होत्या. तर दुपारनंतर उन्हाच्या झळांमुळे रस्त्यावर शुकशुकाट होता. सायंकाळी पाच वाजेपर्यंत उन्हाचे चटके लागत होते. रेल्वे प्रवासातही घामाच्या धारा जाणवत होत्या. अपेक्षेप्रमाणे उत्तरेतून येणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे सकाळपासूनच तापमानात वाढ होत होती. दुपारी दोन ते तीनच्या सुमारास जिल्ह्यात सर्वाधिक तापमान होते. जिल्ह्यात मुरबाड मध्ये सर्वाधिक तापमान नोंदवले गेले. खासगी हवामान अभ्यासक अभिजीत मोडक यांनी आपल्या स्वयंचलित हवामान स्थानकात तापमानाची नोंद केली. मुरबाड मध्ये ४३.२ अंश सेल्सिअस तर बदलापुरात ४२.५ अंश नोंदवले गेले. समुद्र किनाऱ्यावरून येणारे वारे उशिरा आल्याने तापमानात उष्णता नोंदवली गेली. बदलापूरनंतर ४२.४, भिवंडीत ४२.३, मुरबाड जवळील धसई येथे ४२.१, कळवा शहरात ४२ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. या तापमानामुळे सकाळपासूनच उन्हाचे चटके जाणवत होते. रेल्वे प्रवासातही उन्हाचे चटके जाणवत होते. त्यामुळे प्रवासी घामाघूम होत होते. तर दुपारनंतर अनेक रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळाला. ठाणे शहरातील तापमान ४१.६ अंश सेल्सियस इतके नोंदविले गेले. या वाढलेल्या तापमानामुळे ठाणेकरांच्या अंगाची लाहीलाही होवू लागली होती. रस्त्यावरून पायी चालणाऱ्या नागरिकांनी डोक्यात टोपी, तर, काहींनी छत्री घेवून बाहेर पडण्याच्या निर्णय घेतला. तर, अनेकांनी थंड पेयच्या गाड्यांवर आपला मोर्चा वळविला असल्याचे दिसून आले. दरम्यान, या वाढत्या तापमानाने ठाणेकर नागरिकांनी घर आणि ऑफिस मधील एसीत बसून थंडगार हवेत राहणाने जास्त पसंत केले. वातवरणातील वाढत्या उन्हाच्या काहीलीमुळे नागरिकांनी काळजी घ्यावी असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे.

# घरगुती गॅसचा काळाबाजार करणाऱ्यावर गुन्हे शाखेची कारवाई
## सव्वा तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

■ पुणे, अभिजीत येरुल्लू:



घरगुती वापरासाठी लागणाऱ्या गॅस सिलिंडरचे दर दिवसागणिक वाढत असताना, दुसरीकडे याच घरगुती गॅस सिलिंडरचा काळाबाजार पिंपरी चिंचवड शहरामध्ये मोठ्या प्रमाणात सुरु आहे. पिंपरी चिंचवड गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने घरगुती गॅस सिलिंडरचा काळाबाजार करणाऱ्यावर कारवाई करुन तीन लाख २० हजार ११० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई शुक्रवारी दुपारी दीडच्या सुमारास बिजलीनगर केली. याप्रकरणी मुकेश सुरेश पवार (वय २४ रा. बिजलीनगर) या दुकान चालकावर आयपीसी २८५, २८६ सह जिवनावश्यक वस्तुंचा कायदा १९५५ चे कलम ३, ७ सह स्फोटक पदार्थ अधिनियम सन १९०८ चे कलम 5 नुसार गुन्हा दाखल गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलीस शिपाई सदानंद रुद्राक्षे यांनी चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मुकेश पवार हा बिजलीनगर झोपडपट्टी बस स्टॉपजवळ मल्हार गॅस सर्विस व होम अप्लायंसेस नावाचे दुकान चालवतो. त्याच्याकडे कोणतीही परवानगी नसताना घरगुती वापराचे भरलेले गॅस सिलिंडर मधून रिफीलच्या सहाय्याने अवैधरित्या लहान सिलिंडरमध्ये गॅस भरून त्याची चढ्या दराने विक्री करत असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली.

याबाबत माहिती मिळताच अंमली पदार्थ विरोधी पथकाने छपा टाकून ३ लाख २० हजार ११०. रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. यामध्ये २९ घरगुती वापराचे सिलिंडर, ३ व्यावसायिक व ७२ लहान गॅस सिलिंडर, टेम्पो, रिफिलींग करण्यासाठी लागणारे साहित्य जप्त केले आहे. आरोपी बेकायदेशीररित्या कोणत्याही परवानगी शिवाय व कोणत्याही सुरक्षितते शिवाय भरलेल्या सिलेंडर मधील गॅस रिकाम्या गॅस टाकीमध्ये भरत होता. यावेळी जिवीतास धोका होण्याची शक्यता असताना देखील आरोपी हा बेकायदेशीर कृत्य करत होता. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# आपला दवाखाना मध्ये उष्माघात बाधित रूग्णांसाठी एसी-कुलरची व्यवस्था




■ मुंबई, यश सावंतः

महाराष्ट्रासह देशातील ११ राज्यांमध्ये उन्हाचा पारा वाढणार असल्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. त्यासाठी मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या सर्व रुग्णालयांमध्ये दोन खाटा असलेले शीतकक्ष उभारले आहेत. नागरिकांना तातडीने उपचार मिळवेत यासाठी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाही महानगरपालिकेने सज्ज केले आहेत. मुंबई महानगरपालिकेने वैद्यकीय महाविद्यालयांबरोबरच १४ रूग्णालयात उष्माघात बाधित रूग्णांसाठी दोन रुग्ण खाटा शीत कक्ष कार्यरत केले आहेत. तसेच प्रशिक्षित कर्मचारीही नेमले आहेत. तसेच मुंबई महानगरपालिकेने २५० पैकी १०३ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यांमध्येही वातानुकूलित व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. रुग्णांना थंड वातावरण उपलब्ध व्हावे यासाठी आपला दवाखानामध्ये वातानुकूलन यंत्रणेबरोबरच कूलरची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच आपला दवाखानामधील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना उष्माघात नियंत्रण व प्रतिबंधासाठी प्रशिक्षणही देण्यात आले आहे. यामध्ये उष्माघातावरच्या उपाययोजनांवर मार्गदर्शन, उपचार आणि घ्यावयाची काळजी याबाबत माहिती दिली आहे.

वाढत्या तापमानामुळे नागरिकांना विशेषतः लहान मुले, वयोवृद्ध आणि घराबाहेर काम करणाऱ्या नागरिकांना उष्माघात होण्याची शक्यता असते. उष्माघात झाल्यास घ्यावयाची काळजीबाबत जनजागृती करत नागरिकांना माहिती देण्यात येत आहे.

**– डॉ. दक्षा शहा, कार्यकारी आरोग्य अधिकारी, मुंबई महानगरपालिका**


# स्लॅब कोसळून दोघांचा मृत्यू, तर एक जण गंभीर जखमी



■ भाईंदर, सचिन कदमः

भाईंदरमध्ये दुरुस्ती कामादरम्यान घरातील स्लॅब कोसळून कंत्राटदार आणि कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. हरिराम चौहान (५५) आणि मखनलाल यादव (२६) अशी मृत्यू झालेल्या व्यक्तींची नावं आहेत. तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. भाईंदर पूर्व येथील 'श्री नाथ ज्योती' या इमारतीच्या तळ मजल्यावर राहणाऱ्या विनय कुमार त्रिपाठी यांच्या घरी अंतर्गत दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामाचे कंत्राट त्यांनी हरिराम चौहान यांना दिले होते. दरम्यान रविवारी सकाळी साडे दहाच्या सुमारास हे काम सुरु असताना किचन मधील पाण्याच्या टाकीला लागून असलेल्या भिंतीचा स्लॅब अचानक खाली कोसळला. या ढिगार्याखाली कंत्राटदार हरिराम चौहान आणि कामगार मखनलाल यादव व आकाश यादव अडकले होते. याबाबतची माहिती महापालिकेच्या अग्निशमन विभागाला मिळताच जवानांनी तिघांना ढिगार्यातून काढून रुग्णालयात हलवले. मात्र यात हरीनाम चौहान आणि मखनलाल यादव यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरानी सांगितले. तर आकाश यादव हा यात गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर पुन्हा एकदा शहरातील धोकादायक इमारतींचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. भाईंदर मधील इमारतीचा स्लॅब कोसळण्याच्या दुर्घटनेनंतर महापालिका प्रशासन खडबडून जागे झाले आहे. या घटनेतील इमारत ही पाच मजली असून ती फारच जुनी झाली आहे. त्यामुळे इमारतीचा संरचनात्मक अहवाल काढण्याचे आदेश मिराभाईंदर महापालिकेचे आयुक्त संजय काटकर यांनी दिले आहेत.

# डोंबिवली रेल्वे स्थानकातील प्लेटफॉर्मवर छत नसल्याने प्रवाशांना उन्हाचे चटके



■ ठाणे, दिगंबर जाधव :

डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक पाचवरील दिवा बाजूकडील विस्तारित फलाटावर गेल्या वर्षापासून छत नसल्याने प्रवाशांना आता उन्हाचे चटके सहन करत लोकल प्रवास करावा लागतो. मुंबईला जाणारा बहुतांशी प्रवासी डोंबिवली रेल्वे स्थानकातून फलाट क्रमांक पाचवरील जलद लोकल पकडण्याला प्राधान्य देतो, या सर्व प्रवाशांना फलाटावरील छताअभावी आता उन्हाचे चटके सहन करावे लागतात. मागील तीन ते चार वर्षापूर्वी डोंबिवली रेल्वे स्थानकात १५ डब्याच्या लोकल उभ्या राहाव्यात अशा लांबीच्या फलाटांची बांधणी करण्यात आली आहे. फलाट क्रमांक पाचवर पंधरा डब्याच्या फलाटामुळे छत्रपती शिवाजी टर्मिनसकडे धावणाऱ्या लोकल आता तीन डबे दिवा बाजूने जाऊन थांबत आहेत. फलाटाच्या या विस्तारित भागात गेल्या दीड वर्षापासून छत नाही. त्यामुळे आता उन्हाचे चटके सहन करत प्रवाशांना लोकल पकडावी लागते. दुपारी एक ते चार वाजण्याच्या दरम्यानच्या लोकल पकडताना प्रवाशांची सर्वाधिक होरपळ होते. या तीन डब्यांमध्ये एक डबा महिलांचा असतो. त्यामुळे महिलांना उन्हाचे चटके सहन करत लोकल येईपर्यंत फलाटावर उभे राहावे लागते. गेल्या वर्षी पावसाळ्यात छताअभावी प्रवाशांना पावसाचा त्रास सहन करावा लागला होता. या छताचे काम लवकर पूर्ण करावे म्हणून प्रवाशांनी, रेल्वे प्रवासी संघटनांनी मध्य रेल्वे प्रशासनाकडे मागणी केली आहे. त्याची दखल घेतली जात नसल्याचे प्रवाशांकडून सांगण्यात येते. डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक पाचवरून मुंबईला अति जलद लोकल धावतात. या लोकलने प्रवास करण्याला प्रवाशांचे अधिक प्राधान्य असते. त्यामुळे या फलाटावर प्रवाशांची सर्वाधिक गर्दी असते. फलाट पाचवर येणाऱ्या सर्वच लोकल विस्सारित भागात थांबतात. त्यामुळे लोकलचे तीन डबे छत नसलेल्या भागात थांबतात. अनेक प्रवासी छत्री घेऊन, महिला डोक्यावर ओढण्या घेऊन उन्हाचा त्रास टाळण्यासाठी फलाटावर लोकलची वाट पाहत उभे असतात.

रेल्वेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले, डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक पाचवर विस्तारित भागात छत बसविण्याच्या कामाचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठविला आहे. हा प्रस्ताव मंजूर झाला की तातडीने हे काम हाती घेण्यात येणार आहे. मागील वर्षभर डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक पाचवरील विस्तारित भागात छत नाही. प्रवासी उन, पावसात उभे राहून प्रवास करतात याविषयी वेळोवेळी रेल्वे प्रशासनाला कळविले आहे. डोंबिवली रेल्वे स्थानकातून प्रवासी उत्पन्नातून सर्वाधिक महसूल रेल्वेला मिळतो तरी प्रवाशांना सुविधा देण्यात टाळाटाळ का केली जाते.

**– लता अरगडे, अध्यक्षा, उपनगरी रेल्वे महिला प्रवासी महासंघ, डोंबिवली.**

# महागड्या मद्याच्या बाटल्यांवर चोरट्यांचा डल्ला
## माल चोरून ढाब्यांना विक्री



■ ठाणे, नितीन देवळेकर :

कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी भागातील जी. के. वाईन्स या मद्य विक्री दुकानातील महागड्या मद्याच्या बाटल्या चोरून बाहेर मध्यस्थांच्या मार्फत ढाब्यांना विकून पैसे कमविणाऱ्या चार जणांना कल्याण गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. यामध्ये दुकानातील एका कामगाराचा सहभाग आढळून आला आहे. सुनील प्रकाश कुंदल (रा. बॅरेक क्र. १९३४, ओटी सेक्शन, उल्हासनगर), सुरेश प्रीतम पाचरणे (२४, रा. विठ्ठलवाडी झोपडपट्टी, उल्हासनगर), नरेश राघो भोईर (३९, रा. नरेश किराणा दुकानावरती, नेवाळी गाव), सागर श्रावण पाटील (२४, रा. जय भोलेनाथ ढाबा, मांगरूळ) अशी अटक आरोपींची नाव आहेत. त्यांच्याकडून २१ हजार ६५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नरेश पवार यांनी सांगितले, कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी येथे अनिलकुमार भगवानदास बजाज (रा. खारघर, नवी मुंबई) यांचे मद्य विक्रीचे अधिकृत दुकान आहे. या दुकानातून गेल्या महिन्यांच्या कालावधीत एक ते दोन मद्याच्या बाटल्या अशा पद्धतीने एकूण सहा लाख ४० हजार रुपये किमतीच्या मद्याच्या बाटल्या चोरीला गेल्या होत्या. या बाटल्या दुकानातील कामगार सुनील कुंदल याने चोरून नेल्याचे दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यावरून तपासात निष्पन्न झाले होते.याप्रकरणी दुकानदार अनिलकुमार बजाज यांनी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. कल्याण गुन्हे शाखेच्या पथकाने या प्रकरणाचा तपास सुरू केला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर कामगार सुनील याच्यासह इतर आरोपी फरार झाले होते. कल्याण गुन्हे शाखेचे हवालदार गोरक्ष शेकडे यांना मद्य विक्रीतील एक आरोपी सुनील उल्हासनगर येथे येणार आहे, अशी गुप्त माहिती मिळाली. वरिष्ठ निरीक्षक नरेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार दत्ताराम भोसले, गोरक्ष शेडगे, गुरुनाथ जरग, बालाजी शिंदे, विलास कडू, दीपक महाजन, चालक अमोल बोरकर यांच्या पथकाने शनिवारी उल्हासनगर परिसरात सापळा लावला. ठरल्या वेळेत आरोपी सुनील त्या भागात येताच पोलिसांनी झडप घालून त्याला अटक केली. पोलिसांनी केलेल्या तपासात सुनीलने जी.के. वाईन्स दुकानातून चोरून नेलेल्या महागड्या मद्याच्या बाटल्या आरोपींनी संगनमताने कल्याण, डोंबिवली परिसरातील ढाबे मालकांना विकल्या आहेत. पोलिसांनी इतर आरोपींचा शोध घेऊन त्यांना अंबरनाथ, उल्हासनगर भागातून तांत्रिक माहितीच्या आधारे अटक केली. या मद्याच्या बाटल्या खरेदी करणाऱ्या ढाबे चालकांची पोलीस चौकशी करणार आहेत. त्यामुळे ढाबे चालक या प्रकरणात अडचणीत येण्याची माहिती पोलीस अधिकाऱ्याने दिली. कल्याण, डोंबिवली परिसरात एकूण ३५० ढाबे आहेत. एकाही ढाबे मालकाकडे पालिका, शासनाचे व्यवसाय करण्याचे नोंदणीकृत प्रमाणपत्र नसल्याचे समजते.

# उच्च न्यायालयाचा सवाल
## झाडांवर किती दिवस दीपमाळा गुंडाळायच्या?

■ ठाणे, रोहित जैसवाल :



गुढीपाडवा, दसरा, दिवाळी अशा वेगवेगळ्या सणांच्या वेळी गल्लोगल्ली रोषणाई करण्याची हौस वाढली आहे. झाडांवर दिव्यांच्या माळा सोडायच्या किंवा झाडांना दीपमाळा गुंडाळायच्या आणि परिसरात झगमगाट करायचा, हे करण्याकडे राजकीय नेते व महापालिकेचा कल आहे. ठाण्यातील दक्ष नागरिक रोहित जोशी यांनी मुंबई उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला आहे. झाडांवर पक्षी, कीटक व काही प्राणी वास्तव्य करतात. त्यांच्या जीवनचक्रात या रोषणाईमुळे हस्तक्षेप होतो. प्रखर दिव्यांमुळे त्यांना त्रास होतो. अनेकदा अशा रोषणाईमुळे पक्षी या झाडांवर घरटी करत नाहीत. दिव्यांच्या रोषणाईच्या प्रखर प्रकाशाने काही कीटक, सरडे यांना हानी पोहोचते. माणूस हा शक्तिशाली असल्याने तो आपल्याला अनुकूल अशा निर्णयांची अंमलबजावणी करताना आजूबाजूच्या जीवसृष्टीवर आपल्या निर्णयांचा काय परिणाम होईल, याचा विचारही करीत नाही. अनेक छोटे कीटक, सरपटणारे प्राणी हे तर अनेकांच्या खिजगणतीतच नसतात. साहजिकच अशा मंडळींना जोशी यांची याचिका अनावश्यक वाटू शकते. ठाणे शहर सणासुदीला सजले असताना त्यात अपशकुन करण्याचा हा प्रयत्न असल्याची काहींची भावना असू शकते. आमच्याच सणांच्या वेळी हे जैवविविधता प्रेम का उफाळून येते, असा अगोचर सवाल करण्याची फॅशन हल्ली वाढली आहे. मात्र त्याला काही अर्थ नाही. शहरीकरणाच्या रेट्यात अनेक पक्षी, कीटक, सरपटणारे प्राणी यांचे अस्तित्व आपण संपवत आहोत. ज्याप्रमाणे माणसाने बिबट्यांच्या अधिवासात घुसखोरी केल्यामुळे बिबटे मानवी वस्तीत येण्याच्या घटना वाढल्या आहेत. तसाच हा रोषणाईचा सोस आहे. अनेक हॉटेल, रिसॉर्ट आपले ब्रँडिंग होऊन ग्राहकांनी आपल्याकडे यावे याकरिता आपल्या प्रवेशद्वारालगत असलेल्या झाडांवर बारा महिने चोवीस तास रोषणाई करतात. गेल्या काही वर्षांत गणेशोत्सव, नवरात्रोत्सवात भर रस्त्यात मंडप घालून सांस्कृतिक कार्यक्रम केले जातात. अशा वेळी या झाडांवरच हॅलोजन चढवले जातात. अत्यंत प्रखर प्रकाशामुळे त्या झाडावरील पक्ष्यांची घरटी, सरडे, काही कीटक हे पोळून नष्ट होतात; पण कंबर मोडून नाचण्याच्या किंवा गरबाच्या उन्मादात याची जाणीव कुणालाच होत नसेल. न्यायालयात हा विषय गेल्यावर आता ठाणे महापालिका आपली परवानगी न घेता झाडांवर रोषणाई केली जात असल्याचा दावा करते. मात्र दिवाळीत खुद्द महापालिकाच रोषणाई करते, हे उघड झाल्याने महापालिकेचे पितळ उघडे झाले. कल्याण-डोंबिवलीतही महापालिकेला आता न्यायालयाच्या दणक्याची जाणीव झाल्यावर जाग आली. झाडांवर रोषणाई करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची भाषा करताना अधिकारी 'कुणी तक्रार केली तर...', असे पालुपद लावतात. यावरून प्रशासन याबाबत किती बेफिकीर आहे, हेच दिसून येते.

# 'महामार्गावरील बंद भुयारी मार्गाचा ताबा फेरीवाल्यांकडे, पालिकेने केली कारवाई'




■ नवी मुंबई, भावना जैनः

सायन-पनवेल महामार्गावरील नेरुळ येथील पादचारी भुयारी मार्ग बंद आहेत. या पादचारी पुलाचा ताबा फेरीवाल्यांनी घेतला असून या ठिकाणी साहित्य ठेवले जात होते. महापालिकेने या फेरीवाल्यांवर कारवाई केली असून वापर नसलेल्या पादचारी भुयारी मार्गाला टाळे लावले आहे. सायन-पनवेल महामार्गाचे रुंदीकरणाचे काम करताना महामार्ग ओलांडणाऱ्या नागरिकांचे अपघात टाळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून नेरुळ परिसरात चार भुयारी मार्ग बांधण्यात आले होते. यामध्ये एलपी जंक्शन येथे २, एस.बी.आय.कॉलनी आणि उरण फाटा येथे प्रत्येकी एक भुयारी मार्ग बांधण्यात आले होते. परंतु या मार्गांचे काम अर्धवट असल्याने या भुयारी मार्गांचा नागरिकांना वापर करता येत नव्हता. भुयारी मार्ग वापरात यावेत यासाठी २०१८ साली महापालिकेने या चारही भुयारी मार्गांच्या दुरुस्तीच्या कामासाठी पुढाकार घेत सुमारे ४३ लाख रुपये खर्च केले होते. यामध्ये भुयारी मार्गात साचणाऱ्या पाण्यासाठी विद्युत पंप बसविणे, भिंतींना प्लास्टर करणे, छतास पॉली कार्बोनेट शीट बसविणे, फ्लोरिंग, पायऱ्या तसेच भिंतींच्या टाइल्सची दुरुस्ती करणे, भुयारी मार्गाला जोडणाऱ्या पदपथांची कामे करणे, प्लम कॉंक्रीट करणे, रंगकाम करणे, माहिती फलक बसविणे, परिसराची स्वच्छता करणे आदी कामांचा समावेश होता. महापालिकेने काम केल्यावर देखील हे भुयारी मार्ग वापरात आले नाहीत. त्यानंतर यामधील साहित्याची देखील चोरी झाल्याचे प्रकार घडले होते. एलपी येथे नागरिकांची वर्दळ असली तरी शॉर्टकट मारण्यासाठी नागरिक रस्ते ओलांडणे पसंत करतात. तसेच एसबीआय कॉलनी आणि उरण फाटा येथे नागरिकांची वर्दळ नसल्याने या ठिकाणचे भुयारी मार्ग देखील ओस पडले होते. त्यानंतर या भुयारी मार्गांचा ताबा मद्यपी आणि गर्दुल्यांनी घेतला होता. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महापालिकेने या भुयारी मार्गाला टाळे बसविले होते. नेरुळ एलपी येथील भुयारी मार्गाचे टाळे तोडून काही फेरीवाले या जागेचा वापर साहित्य ठेवण्यासाठी करत असल्याने महापालिकेने या भुयारी मार्गाला पुन्हा टाळे बसविले आहे.

# गोखले-बर्फीवाला पुलाची जोडणी सुरू... जून अखेरपर्यंत पूल खुला करण्याचा प्रयत्न

■ मुंबई, विशाल पाटील:



अंधेरीतील गोखले उड्डाणपूल आणि बर्फीवाला पुलाच्या जोडणीला अखेर रविवारी सुरुवात झाली. 'आयआयटी मुंबई'ने ८ एप्रिल रोजी या जोडणीच्या संरेखनाचा अंतिम अहवाल सादर केला होता. त्यानुसार या जोडणीसाठी चारऐवजी दोन स्तंभ उंचावण्यात येणार आहेत. त्यामुळे पूल जोडणीचा कालावधी कमी होऊन तो लवकर खुला करण्यासाठी प्रयत्न केले जातील. येत्या जूनअखेर दोन्ही पुलांची जोडणी करून ते वाहतुकीसाठी सुरू करण्याचा पालिकेचा प्रयत्न असणार आहे. आमदार अमित साटम यांच्या माहितीनुसार, सध्या काम करणाऱ्या कंत्राटदाराकडूनच नवीन काम केले जाणार आहे. गोखले-बर्फीवाला पुलाच्या उत्तरेकडील जोडणीसाठी तीन ते चार कोटींचा खर्च अपेक्षित आहे. सुरुवातीला पालिकेकडून या पुलाच्या पृष्ठभागाचे काम सुरू करण्यात आले आहे. तर, उत्तरेकडील पुलाच्या संपूर्ण जोडणीचे काम पूर्ण करण्यासाठी ६० ते ९० दिवसांचा कालावधी लागणार असल्याचे पालिका अधिकाऱ्यांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**उत्तरेकडचे झाले, दक्षिणेचे काय?**

१) गोखले पुलाच्या पुनर्बांधणीत, बर्फीवाला पुलाला गोखले पूल जोडून जुहूपर्यंतच्या वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवला जाणार होता. मात्र, काही अभियांत्रिकी दोषांमुळे गोखले पुलाची उंची २.८ मीटरने अधिक वाढल्याने दोन पूल जोडण्याचा प्रयत्न फसला. या पार्श्वभूमीवर पालिकेने या समस्येवर उपाय सुचवण्यासाठी 'आयआयटी' व 'व्हीजेटीआय'चा सल्ला मागितला होता. त्यानुसार पूल जोडणीसाठी आता उत्तरेकडचे काम सुरू करण्यात आले आहे.

२) दुसऱ्या गर्डरसाठीचे साहित्य हळूहळू पोहोचत आहे. दुसऱ्या बाजूच्या गर्डरसाठी लागणाऱ्या ३२ स्पॅनपैकी जवळपास ५ स्पॅन मुंबईत पोहोचले असून आता त्यांचे एकत्रीकरण करून कामाला सुरुवात केली जाणार आहे. मात्र, उत्तरेप्रमाणेच दक्षिण बाजूला देखील जोडणीची हीच समस्या पुढे येणार आहे. त्यासाठी पालिका काय करत आहे? तिथेही मार्गिका खुली केल्यानंतर जोडणीचे काम हाती घेणार का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

//सुविचार ‘आयुष्यात कितीही जखमा झाल्या तरी कधीही निराश होऊ नका कारण सूर्यकिरणे कितीही चटके देत असली तरी समुद्र कधीही कोरडे होत नाही.’ //



# वजन घटवण्यासाठी ‘पीनट बटर’ उपयुक्त

**सँडविचमध्ये** लावण्यासाठी एक अतिशय पौष्टिक ‘स्प्रेड’ म्हणून ‘पीनट बटर’ म्हणजेच शेंगदाण्यांपासून तयार केले गेलेले बटर अतिशय लोकप्रिय होऊ लागले आहे. अतिशय पौष्टिक तत्त्वांनी परिपूर्ण असे पीनट बटर वजन घटवण्यासाठीही उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. पीनट बटरमध्ये असणारी प्रथिने, जीवनसत्त्वे आणि क्षार वजन घटवण्यास सहाय्यक आहेत. पीनट बटरच्या सेवनाने भूक लवकर शमत असून, त्यामुळे अन्नाचे सेवन आपोआपच कमी होते. याच्या सेवनाने शरीराची चयापचय शक्ती वाढत असून, त्यामुळेही वजन घटण्यास मदत होते. पीनट बटर पोळीबरोबर, भाकरीबरोबर किंवा गव्हापासून तयार केलेल्या ब्रेडसोबत खाता येऊ शकते. फळे किंवा कच्च्या भाज्यांच्या कापांच्या सोबतही हे बटर खाता येते. सकाळच्या नाश्त्यामध्ये ओटमिल घेत असल्यास किंवा दह्यामध्ये मिसळूनही पीनट बटरचे सेवन करता येते. मात्र वजन घटवताना पीनट बटर आहारामध्ये समाविष्ट करताना त्यामध्ये इतर ‘ॲडीटिव्ह’ असणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. पीनट बटर बाजारातून आणण्यापेक्षा घरी तयार करणे अधिक चांगले. हे बटर बनवण्यासाठी शेंगदाणे भाजून घ्यावेत आणि त्यांची साले काढून घ्यावीत. त्यानंतर शेंगदाणे मिक्सरमध्ये घालून थोडेसे शेंगदाण्याचे तेल घालावे, त्यानंतर मिक्सर सुरू करून शेंगदाणे तीन ते चार मिनिटे मिक्सरवर वाटावेत. तयार झालेल्या शेंगदाण्याच्या पेस्टला पीनट बटर म्हटले जाते. यामध्ये चवीला थोडेसे मीठ घालावे. तसेच आवडत असल्यास किंचित मध आणि दालचिनीची पूडही यामध्ये घालता येऊ शकते.





# चेहरा उजळण्यासाठी कांदा आणि लसणाचा फेसपॅक

सुंदर, नितळ, गोरी त्वचा कोणाला नको असते. यासाठी लोक चेहऱ्यावर विविध प्रयोग करत असतात. मात्र कांदा आणि लसूणचा फेसपॅक तुम्ही कधी ट्राय केलाय का?



**त्वचा उजळण्यासाठी लसूण फायदेशीर** : लसूणमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी६, सेलेनियम, झिंक असते. त्वचेवरील मुरुमे हटवण्यासाठी लसूण फायदेशीर आहे. लसणाच्या पेस्टमध्ये मध मिसळून हा पॅक लावल्यास चेहऱ्यास फायदा होता. पिंपल्सच्या जागी लसूणचा रस लावा, पिंपल्स लवकर बरे होतील आणि डाग राहणार नाहीत.

**त्वचेसाठी वरदान आहे कांदा** : कांद्यामध्ये अनेक व्हिटॅमिन असतात. याशिवाय अँटीऑक्सिडंट्सही असतात. कांद्याच्या रसात अँटी सेप्टिक, अँटी-बॅक्टेरियल यासारखे गुण असतात. ज्यामुळे त्वचेवरील मुरुमे निघून जातात.

**कसा करावा वापर** : तुम्ही रोजच्या डाएटमध्ये कच्च्या कांद्याचा वापर करू शकता. कांदा त्वचेसाठी चांगला. याशिवाय तुम्ही कांदा किसून त्याचा फेसपॅक बनवून वापरू शकता. तसेच कांद्याच्या रसाचाही वापर करू शकता.

# घरगुती लिपस्टिक तयार करणे इतके सोपे

**बाजारात** मिळणारे कॉस्मेटिक महाग तर असतातच पण आपल्या स्कीनवर विपरित परिणाम करणारे असतात. त्यातून ओठ हे तर सर्वात नाजूक असतात, यावर रोज बाजारातील लिपस्टिक लावली तर ओठ काळे पडू लागतात. म्हणून येथे आम्ही सोपी पद्धत सांगत आहोत ज्याने आपण घरी लिपस्टिक तयार करू शकता.



**साहित्य** : एक बीट, १/२ कोकोनट ऑइल, १/२ चमचा मधमाश्यांचे मेण, १/२ चमचा कोको बटर

**कृती** : बिटाचे पातळ काप करून वाळू द्या. डिहायड्रेटरमध्ये हे काप १२० डिग्रीवर ८ तास ठेवून वाळवू शकता. नंतर मिक्सरमधून वाटून पावडर तयार करा. मंद आचेवर एका भांड्यात अर्धा ते १ कप पाणी टाकून त्यात मेण, कोकोबटर, कोकोनट ऑइल आणि बीट पावडर मिसळा. चांगले ढवळा. गडद रंगासाठी अधिक पावडर किंवा वाळलेल्या चेरीज वापरू शकता. घट्ट झाल्यावर मऊ कपड्याने गाळून घ्या. लिप कंटेनरमध्ये हे मिश्रण ओतून घ्या. थंड होऊ द्या. आपले लिपस्टिक तयार झाले. हे पूर्णपणे नैसर्गिक असल्यामुळे ओठ काळे पडणार नाहीत.

# ‘ब्लॅक टी’चे असेही फायदे

**ब्लॅक** टीमुळे शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. भारतात सर्वाधिक प्यायले जाणारे पेय म्हणून चहाचा पहिला क्रमांक लागतो. चहा, कॉफी म्हटले की अनेक जण दुधाचा चहा, कॉफीला पसंती देतात. दुधाच्या चहाच्या तुलनेत खूप कमी लोकांना ब्लॅक टी आवडते. तुलनेने ब्लॅक टी चवीला चांगली लागत नसली तरी तिचे अनेक फायदे आहेत. बाजारात अनेक प्रकारच्या ब्लॅक टी उपलब्ध आहेत. घरात बनवली जाणरी ब्लॅक टी लिंबू रस टाकून घेता येते. बाजारात इंग्लिश ब्रेकफास्ट टी, अर्ल ग्रे टी, आसाम टी, दार्जिलिंग टी, निलगिरी टी असे चहाचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत.



काही दिवसांपूर्वी अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीत एक संशोधन करण्यात आले होते. या संशोधनाचा अहवाल युरोपियन जर्नल ऑफ न्यूट्रिशनमध्ये पब्लिश करण्यात आला होता. या अभ्यासानुसार ब्लॅक टीमध्ये विविध प्रकारचे विशेष तत्त्व असल्याचे सिद्ध झाले आहे. ब्लॅक टीमधील चहाचे विशेष तत्त्व पोटात जाऊन मोठा प्रभाव पाडतात. ब्लॅक टीमुळे वजन घटवण्यास मदत होते. तसंच शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. विषारी द्रव्ये शरीरातून बाहेर निघाल्यामुळे कोणताही आजार बळावण्याची शक्यता कमी होते. टॉक्सिंस शरीरातून बाहेर पडल्यामुळे आरोग्यही उत्तम राहण्यास मदत होते.

चहात ॲण्टी ऑक्सिडेंट सर्वाधिक असतात. अनेक संशोधनांतून संशोधकांनी ब्लॅक टी आणि ग्रीन टीमध्ये प्रोबायोटिक्स तत्त्व आढळून येत असल्याचे सांगितले आहे. प्रोबायोटिक्स तत्त्व शरीरात प्रतिरोधक सूक्ष्मजीवांच्या वाढीसाठी मदत करतात. ब्लॅक टी वजन नियंत्रणात ठेवून अनेक आजारांपासून बचावही करते.



ब्लॅक टीमध्ये दूध आणि साखर नसल्याने शरीरात फॅट जमा होत नाही. चहातील ॲण्टीऑक्सिडेंट शरीरातील अतिरिक्त चरबी न वाढू देण्याचे काम करते. एका संशोधनातून दिवसांतून तीन वेळा ब्लॅक टी पिण्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहत असल्याचे समोर आले आहे. डोकेदुखी होत असल्यास ब्लॅक टीमध्ये लिंबू टाकून प्यायल्याने डोकेदुखीत आराम मिळतो.

दररोज पुढे जाण्याच्या शर्यतीत प्रत्येक व्यक्ती धकाधकीचं आयुष्य जगत आहे. लवकर पुढे जात लवकर यश मिळवण्याच्या नादात अनेक जण आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. सोपं, लवकर आणि जिभेच्या चवी पुरवण्यासाठी अनेक जण फास्ट फूडच्या आहारी गेले आहेत. या फास्ट फूडमुळेच अनेक जण लठ्ठपणाचे शिकार होत आहेत. अशाप्रकारे आलेला लठ्ठपणा कमी करणं तितकंसं सोपं नाही. लठ्ठपणामुळेच शरीरात अनेक प्रकारचे विकार बळावतात. अनेक आजारांचे कारण लठ्ठपणा असून शरीरातील लठ्ठपणामुळेच अनेक आजारांना निमंत्रण दिले जाते.



# अनेक आजारांचे कारण लठ्ठपणा; असे ठेवा नियंत्रण

**लठ्ठपणाचे** निदान व्यक्तीच्या शारीरिक तपासणी आणि त्याच्या इतिहासावर अवलंबून आहे.

लठ्ठपणामुळे आलेल्या रोगांची शक्यता तपासण्यासाठी व्यक्तीच्या ‘बीएमआय’ बॉडी मास इंडेक्सचे मापन केले जाते. आई-वडिलांपैकी एकाला लठ्ठपणा असल्यास मुलांमध्येही लठ्ठपणा होण्याची शक्यता असते. कॅलरीयुक्त आहार, जंक, फास्ट फूड, पेय पदार्थांचे अधिक सेवन यामुळे लठ्ठपणाची समस्या निर्माण होण्यास सुरुवात होते. फळं, भाज्या यांच्या कमी सेवनानेही व्यक्ती लठ्ठपणाचा शिकार होऊ शकतात. लठ्ठपणामुळे स्ट्रोक, कॅन्सर, प्रजनन क्षमता कमी होणे, ऑस्ट्रियोआर्थराइटिस, टाइप २ डायबिटीज, पित्ताशयाचे आजार, उच्च रक्तदाब, लिवरला सूज येणे, श्वास घेण्यास अडथळा, नर्व डिस्ऑर्डर यासारखे गंभीर आजार होण्याची शक्यता असते.

यासारखे आजार बळावू नये यासाठी नियमित व्यायामाने वजन नियंत्रणात ठेवू शकता. जोरात चालणे, पोहणे, सायकल चालवणे यासारखे व्यायाम करू शकता. दिवसांतून तीन वेळा नियमित आहार घ्या. काही लोक भूक लागण्यावर कोणत्याही वेळी खातात. वेळ न पाहता गोड पदार्थ आणि फास्ट फूड खातात. त्यामुळे लठ्ठपणा वाढीस लागतो. कमी कॅलरीयुक्त आहार, फळं, भाज्या, कडधान्यांचे सेवन करा. मिठाई, अल्कोहलचे सेवन अगदी कमी प्रमाणात करा. अतिरिक्त चरबी वाढवणारे पदार्थ खाण्यापासून लांब राहा.

# कच्च्या केळ्याचे सेवन अनेक विकारांवर उपयुक्त

**पिकलेली** केळी आपल्या आहारामध्ये नेहमीच समाविष्ट असून, या फळाचे आपल्या आरोग्याच्या दृष्टीने असणारे फायदे आपल्या परिचयाचे आहेत. पोटॅशियम आणि क्षार मुबलक असणारे हे फळ पचण्यास हलके आहे. याच्या सेवनाने शरीरामध्ये त्वरित ऊर्जा उत्पन्न होत असते. म्हणूनच व्यायामापूर्वी एखादे केळे खाण्याचा सल्ला आहारतज्ज्ञ देत असतात.




पिकलेल्या केळ्यांप्रमाणे कच्चे केळे देखील भाजी, भजी, कोफ्ते इत्यादी पदार्थ बनवण्याकरिता वापरले जात असते. पिकलेल्या केळ्यांप्रमाणेच कच्च्या केळ्याचे सेवनही आरोग्याच्या दृष्टीने अतिशय फायदेशीर म्हटले जाते. कच्च्या केळ्यांमध्ये फायबर आणि हेल्दी स्टार्च असून, ही तत्त्वे आतड्यांमध्ये कोणत्याही प्रकारचे ‘ब्लॉकेज’ उत्पन्न होऊ देत नाहीत. त्याचमुळे ज्यांना बद्धकोष्ठाचा त्रास आहे, त्यांनी कच्च्या केळ्यांचा समावेश आहारामध्ये अवश्य करावा. ज्यांना मधुमेह आहे, किंवा ज्यांना मधुमेह असल्याचे नुकतेच निदान झाले आहे, त्यांच्यासाठी कच्च्या केळ्याचे सेवन फायदेशीर आहे. याच्या सेवनाने शरीरातील ब्लड-शुगरची पातळी नियंत्रणात राहते. कच्च्या केळ्यामध्ये फायबरची मात्रा मुबलक असून, याच्या सेवनाने पोट अधिक काळ भरलेले राहते व त्यामुळे वारंवार भूक लागण्याची भावना होत नाही. याच्या सेवनाने पचनक्रियाही उत्तम राहते. त्यामुळे ज्यांना वारंवार अपचनाचा त्रास होतो, त्यांनी आपल्या आहारामध्ये कच्च्या केळ्याचा समावेश अवश्य करावा.

# पूजा सावंतने पतीच्या वाढदिवसाची सुरू केली तयारी; लग्नानंतरचा पहिला वाढदिवस ठरणार खास

मराठी सिनेसृष्टीतील अभिनेत्री पूजा सावंत लग्नानंतर अनेकदा चर्चेत आली आहे. सध्या पूजा आणि तिचा पती सिद्धेश चव्हाण ऑस्ट्रेलियामध्ये स्थायिक आहेत. कारण- पूजाचा नवरा ऑस्ट्रेलियातील एका फायनान्स कंपनीत कामाला आहे.

पूजा आणि सिद्धेशने लग्नानंतरचा त्यांचा पहिला सण म्हणजेच गुढीपाडवा ऑस्ट्रेलियात मराठी परंपरेनुसार साजरा केला. त्याचे फोटो पूजाने तिच्या सोशल मीडियावर शेअर केले होते. अशातच



आता सिद्धेशचा वाढदिवस काही दिवसांवर आलाय. पूजाने त्याची तयारीदेखील सुरू केलीय. या प्री-बर्थडे सेलिब्रेशनचे फोटो चर्चेत आहेत.

पूजा सावंतने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर पती सिद्धेशबरोबर काही फोटो शेअर केले आहेत. पहिल्या फोटोत पूजा सिद्धेशच्या हातात हात घालून बसली आहे. ‘वाढदिवसापूर्वीचं सेलिब्रेशन सुरू झालं आहे’, असं कॅप्शन पूजानं या फोटोला दिलं आहे. सिद्धेशनं यात काळ्या रंगाचं टी-शर्ट व त्यावर सफेद रंगाचं जॅकेट आणि जीन्स घातली आहे.

दुसऱ्या फोटोमध्ये सूर्यास्त होत असलेल्या सुंदर अशा वातावरणामध्ये पूजा आणि सिद्धेश एकमेकांकडे बघत रोमॅंटिक पोज देताना दिसतायत. नुकतेच पूजानं त्यांच्या वीकेंडचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले होते. पूजा आणि सिद्धेश आकाशपाळण्यात बसले होते. दोघांनी वीकेंडचा पुरेपूर आनंद लुटला.

सिद्धेशचा वाढदिवस जवळ आला असून, पूजा आधीपासूनच त्या तयारीला लागली आहे. सिद्धेशच्या वाढदिवसाचेही फोटो ती तिच्या चाहत्यांबरोबर लवकरच शेअर करील.

दरम्यान, अभिनेत्री पूजा सावंत आणि सिद्धेश चव्हाण यांनी २८ फेब्रुवारी २०२४ रोजी लग्नगाठ बांधली. साखरपुडा, संगीत, मेंदी, हळद व सप्तपदी असा समारंभपूर्वक लग्नसोहळा पाहायला मिळाला. पूजा आणि सिद्धेशच्या लग्नसोहळ्याला प्रार्थना बेहेरे, भूषण प्रधान, वैभव तत्त्ववादी, सुखदा व अभिजीत खांडकेकर अशा अनेक कलाकारांनी हजेरी लावली होती.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ५७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | 7 | 5 | | 3 | 4 |
| | | | | | | 9 | | |
| | 5 | 3 | 6 | 9 | | | | 8 |
| 3 | | 4 | | 2 | 7 | | | |
| | 7 | 8 | | | 3 | 2 | | |
| 9 | | | 8 | 5 | | | | |
| | 9 | 7 | 4 | | | 5 | 8 | 1 |
| | 2 | 5 | | 6 | | 4 | 9 | |
| | | | | 8 | | 7 | 2 | |

### उत्तर सुडोकू -५६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 8 | 3 | 6 | 2 | 4 | 7 | 9 | 5 |
| 4 | 9 | 7 | 5 | 8 | 3 | 1 | 6 | 2 |
| 2 | 5 | 6 | 9 | 7 | 1 | 8 | 3 | 4 |
| 5 | 6 | 8 | 2 | 1 | 7 | 9 | 4 | 3 |
| 7 | 1 | 4 | 3 | 5 | 9 | 2 | 8 | 6 |
| 9 | 3 | 2 | 8 | 4 | 6 | 5 | 7 | 1 |
| 8 | 7 | 1 | 4 | 6 | 5 | 3 | 2 | 9 |
| 6 | 2 | 9 | 1 | 3 | 8 | 4 | 5 | 7 |
| 3 | 4 | 5 | 7 | 9 | 2 | 6 | 1 | 8 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# “एक्स खूप मोठी गटार गंगा...”, चिन्मय मांडलेकरचं स्पष्ट मत सोशल मीडियावर सक्रिय नसण्याबाबत म्हणाला...



मराठी सिनेसृष्टीतील आघाडीच्या अभिनेत्यांपैकी एक म्हणजे चिन्मय मांडलेकर. चिन्मयने आपल्या दमदार अभिनयाने मराठीसह हिंदी सिनेसृष्टीत स्वतःची एक वेगळी छाप उमटवली आहे. चिन्मय फक्त उत्कृष्ट अभिनेता नसून तो लेखक, दिग्दर्शक, निर्मिता देखील आहे. पण चिन्मय इतर कलाकारांप्रमाणे सोशल मीडियावर अधिक सक्रिय नसतो. तो कधी चालू घडामोडींविषयी परखड मत देखील सोशल मीडियाद्वारे मांडताना दिसत नाही. यामागचं कारण त्यानं एका मुलाखतीमधून स्पष्ट केलं आहे.

काही दिवसांपूर्वी चिन्मय मांडलेकरने ‘अजब गजब’ या पॉडकास्टला मुलाखत दिली. यावेळी अभिनेत्याने सोशल मीडियावर अधिक सक्रिय न राहण्यामागचं कारण सांगितलं. चिन्मय म्हणाला, “मी सोशल मीडियावर नाही म्हणून मी काम करतोय. मी पूर्वी होतो. जसं इतरांचं फेसबूक अकाउंट होतं, तसं माझंही होतं. आयुष्यात मला ट्विटर (एक्स) जमलं नाही. कारण मला ती खूप मोठी गटार गंगा वाटते. त्यामुळे मी त्या वाटेला जात नाही. इन्स्टाग्रामवर माझं आता एक अकाउंट आहे. कारण आपण जी काम करतो, चित्रपट म्हणा, मालिका म्हणा किंवा नाटक म्हणा ते प्रमोट करावं लागतं. त्यासंबंधित पोस्टर शेअर करावे लागतात.”

“मी माझ्या एकांकिका किंवा नाटकात एक वाक्य लिहिलं होतं की, जगात काय चाललंय हे आपल्याला कळावं ही पूर्वी माणसाची भूक होती. त्याला आपण म्हणायचो, इंफॉर्मेशन (माहिती). आता आपलं काय चाललंय हे जगाला कळावं त्याला म्हणतात सोशल मीडिया. माझी इच्छा नाहीये, माझं काय चाललंय हे जगाला कळावं. कारण मला नाही वाटतं, मी तितका महत्त्वाचा आहे. मी कुठं जातोय? मी काय करतोय? मी कुठे जेवलो? मी कुठे गेलो? मी काय खाल्लं? माझ्या कुटुंबातील सदस्य काय करतात? हे जगाला कळावं असं मला अजिबात वाटत नाही. त्यांच्या पण आयुष्यात काम आहे. त्यामुळे सोशल मीडियापासून दूर असतो.”

पुढे चिन्मय म्हणाला, “दुसरं मला हळूहळू जाणवू लागलं. विशेष म्हणजे लॉकडाऊननंतर की, आपल्याला लोकांबद्दल खूप अनावश्यक माहिती कळतं राहते. लोकांची मत काय आहेत? वगैरे. एवढंच नव्हे सोशल मीडियावरच्या भांडणामुळे मी लोकांच्या भल्याभल्या मैत्र्या तुटताना बघितल्या आहेत. माझे इतके मित्र आहेत आणि ते इतक्या भिन्नभिन्न राजकीय विचारसरणीचे आहेत. तरीही ते माझे मित्र आहेत. इतक्या वर्षांचा काळ, दंगली, निवडणूका, या सगळ्या गोष्टी आमची मैत्री तोडू शकली नाही. तर सोशल मीडियामुळे ती तुटू नये म्हणून मी सोशल मीडियापासून लांब आहे आणि ते बरं आहे.”

## दिनविशेष

### १६ एप्रिल

- ◆१८५३: भारतात प्रथमच बोरीबंदर ते ठाणे प्रवासी रेल्वे सेवा सुरू झाली.
- ◆१९२२: मुळशी सत्याग्रह सुरू झाला.
- ◆१९४८: राष्ट्रीय छात्र संघाची (ठउउ) स्थापना झाली.
- ◆१९७२: केप कॅनव्हेरॉल, फ्लोरिडा येथून अपोलो-१६ या अंतराळयानाचे प्रक्षेपण करण्यात आले.
- ◆१९९५: निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांना ऑनेस्ट मॅन ऑफ इयर हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.
- ◆ १९९९: चालकरहित निशांत विमान जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या त्रिशूल क्षेपणास्त्राची चंडीपूर येथे चाचणी करण्यात आली.
- ◆१८६७: ऑर्व्हिल राइट याच्यासह इंजिनाच्या विमानाचा शोध लावणारे अमेरिकन अभियंते विल्बर राइट यांचा जन्म. (मृत्यू: ३० मे १९१२)
- ◆१८८९: विनोदी अभिनेता, दिग्दर्शक आणि संगीतकार चार्ली चॅपलिन यांचा जन्म. (मृत्यू: २५ डिसेंबर १९७७)
- ◆१९२४: भारतीय राजनयिक मदनजीत सिंग यांचा जन्म.
- ◆१९३४: केंद्रीय पेट्रोलियम मंत्री तसेच रेल्वे राज्यमंत्री राम नाईक यांचा जन्म.
- ◆१९४२: विल्यम्स एफ-१ रेसिंग टीमचे स्थापक फ्रॅंक विल्यम्स यांचा जन्म.
- ◆१९६१: भारतीय वकील आणि राजकारणी जर्बोम गॅमलिन यांचा जन्म.
- ◆१९६३: पाकिस्तानी क्रिकेटपटू सलीम मलिक यांचा जन्म.
- ◆१९७२: स्पॅनिश लॉनटेनिस खेळाडू कोंचिता मार्टिनेझ यांचा जन्म.
- ◆१९७८: मॉडेल आणि हिंदी चित्रपट अभिनेत्री लारा दत्ता यांचा जन्म.
- ◆१९९१: चित्रपट आणि नाटक अभेनेते आशिष खाचणे यांचा जन्म.
- ◆१७५६: फ्रेंच खगोलशास्त्रज्ञ जॅक्स कॅसिनी यांचे निधन. (जन्म: ८ फेब्रुवारी १६७७)
- ◆ १८५०: मॅडम तूसाँ वॅक्स म्युझियम च्या संस्थापिका मेरी तूसाँ यांचे निधन. (जन्म: १ डिसेंबर १७६१)
- ◆१९६६: शांतीनिकेतन मधील जगविख्यात चित्रकार नंदलाल बोस यांचे निधन. (जन्म: ३ डिसेंबर १८८२)
- ◆१९९५: अभिनेते आणि वकील रमेश टिळेकर यांचे निधन.
- ◆२०००: कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू तसेच शाहू महाराजांचे चरित्रकार अप्पासाहेब पवार यांचे निधन.

## भविष्य

**मेष** असुरक्षितता अथवा आत्मविस्मृतीच्या भावनेमुळे चक्कर येईल. तुमच्या नियमित कष्टांचे आज चांगल चीज होईल.

**वृषभ** विश्रांती घ्या आणि कामात व्यग्र असताना मधेमधे थोडा आराम करा. वाईट सवयी तुम्हाला जडविण्यासाठी कारणीभूत ठरणाऱ्या व्यक्तींपासून दूर राहा.

**मिथुन** चांगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. तुमच्या पालकांसोबत तुमचा आनंद वाटा.

**कर्क** तुमचे विनयशील वागण्याबद्दल कौतुक होईल. अनेक लोक तुमच्यावर स्तुतिसुमने उधळतील. मित्रांच्या मदतीमुळे आर्थिक अडचण सुकर होईल.

**सिंह** तुमच्या विचारांवर ज्यांचा असाधारण प्रभाव आहे अशा विशेष व्यक्तीची ओळख मित्रामुळे होऊ शकते. किरकोळ आणि ठोक व्यापाऱ्यांसाठी चांगला दिवस.

**कन्या** अलिकडे घडलेल्या घटनांमुळे तुमचे चित्त विचलित होईल. ध्यानधारणा आणि योगासने यामुळे तुम्हाला शारिरिक व अध्यात्मिक फायदा होईल. आज कार्य क्षेत्रात तुमच्या कुणी जुन्या कामाचे कौतुक होऊ शकते.

**तुला** भावनिकदृष्ट्या तुम्ही स्थिर व्यक्ती नाही आहात, त्यामुळे इतरांसमोर कसे वागता बोलता त्याबाबत सावध असणे योग्य ठरेल. स्थावर जंगम मालमत्ता गुंतवणूक लाभदायी ठरेल.

**वृश्चिक** विनाकारण स्वतःची निंदा करून तुमचा उत्साह घालवू नका. दिवसाच्या उत्तरार्धात आराम करा. कामातील दबावामुळे मानसिक खळबळ आणि अशांती वाढेल.

**धनु** आजच्या दिवशी तब्येत एकदम उत्तम असेल. तुम्हाला जिथे बोलण्याची गरज नाही तिथे तुम्ही बोलू नका. जबरदस्ती बोलण्याच्या कारणाने तुम्ही स्वतःला चिंतेत टाकू शकतात.

**मकर** तुमच्या वडिलांचा सल्ला आज तुम्हाला कामाच्या क्षेत्रात धन लाभ करवून देऊ शकते. तुमचे हसतमुख वागणे कुटुंब जीवन प्रकाशमान करतील. शक्य असेल तर लांबचा प्रवास टाळणे चांगले.

**कुंभ** तुमचे व्यक्तिमत्व सुधारण्यासाठी कठोर प्रयत्न करा. तुम्हाला एकाकी वाटेल तेव्हा तुम्ही तुमच्या कुटूंबियांची मदत घ्या. त्यामुळे नैराश्यापासून तुमचा बचाव होईल. परिणामी सुयोग्य, संयुक्तिक निर्णय घेण्यास तुम्हाला मदत होईल.

**मीन** आजवर दबून राहीलेले सुप्त प्रश्न उभे राहील्यामुळे मानसिक तणाव येऊ शकतो. आज तुम्ही सहजपणे भांडवल उभे कराल - राहिलेली देणी परत मिळवाल - किंवा नवीन प्रकल्पांसाठी निधी मागाल. कुटुंबाच्या कल्याणासाठी मेहनत करा.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# मतदार राजा जागा हो...!

अगदी तोंडावर आलेल्या या वेळच्या लोकसभा निवडणुकांमध्ये मतदार राजा कोणाच्या पारड्यात आपला कौल टाकणार याची उत्सुकता अगदी शिगेला पोहोचली आहे. एरवी बिनचेहऱ्याच्या मानल्या जाणाऱ्या भारतीय मतदार राजाने वेळोवेळी आपली विवेकबुद्धी मतपेटीतून कशी दाखवून दिली आहे आणि देशात सत्तांतर घडवून आणले आहे, याचा धावता आढावा... एकीकडे ग्रीष्म ऋतू आपली दाहकता दाखवायला लागला असताना देशात लोकसभा निवडणुकांचा ज्वरही वाढायला लागला आहे. निवडणूक म्हणजे लोकशाहीचा उत्सव, असं बजावत त्यामध्ये सहभागी होण्याचं आवाहन सरकारतर्फे केलं जात आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या सुमारे पन्नास वर्षांच्या कालावधीत झालेल्या लोकसभा निवडणुकांचा आढावा घेतला तर असं लक्षात येतं की, प्रत्येक निवडणूक म्हणजे खरोखर लोकशाहीचा उत्सव होता, असं म्हणता येणार नाही. काही निवडणुका केवळ एक उपचार पार पडल्यासारख्या झाल्या. पण काही निवडणुकांमध्ये लोकांचा असा सहभाग होता की, त्या कोणत्याही नेत्याच्या किंवा पक्षाच्या हातात राहिल्या नाहीत. इथल्या मतदार राजाने आपल्याला योग्य वाटेल त्या पक्षाला, नेत्याला एकमुखी कौल दिला. त्यामध्ये काही राजकीय नेत्यांचं/पक्षांचं पानिपत झालं, तर काही बाजूला फेकले गेलेले नेते सत्तेच्या केंद्रस्थानी आले. अर्थात त्यांचं वर्तन पसंत पडलं नाही तर त्यांनाही या जनतेने पुन्हा घरची वाट दाखवली. हा खरा लोकशाहीचा उत्सव! त्या दृष्टीने पाहिलं तर गेल्या ५० वर्षांच्या राजकीय इतिहासात पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या १७ वर्षांच्या ऐतिहासिक कारकीर्दीत झालेल्या सर्व निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाची निरंकुश सत्ता या देशात राहिली. पण पंडितजींच्या निधनानंतर त्यांचे उत्तराधिकारी लालबहादूर शास्त्री दुर्दैवाने जेमतेम दीड वर्षं ही जबाबदारी सांभाळू शकले आणि त्यानंतर मार्च १९७७ ते जुलै ७९ ही सुमारे सव्वादोन वर्षांची जनता पक्षाची राजवट वगळता, ऑक्टोबर १९८४ पर्यंत, म्हणजे जीवनाच्या अंतापर्यंत, पंडितजींच्या वादळी व्यक्तिमत्त्वाच्या कन्या इंदिरा गांधी यांनी इथं सत्ता गाजवली. 'गुंगी गुडिया' अशी प्रतिमा घेऊन १९६६ मध्ये देशाच्या पंतप्रधान झालेल्या इंदिराजींना पुढच्याच वर्षी झालेल्या (१९६७) सार्वत्रिक निवडणुकीत निसटतं बहुमत मिळालं. पण १९६९ मध्ये काँग्रेस पक्ष फुटल्यानंतर त्यांच्या नेतृत्वाखाली लढवली गेलेली १९७१ ची मध्यावधी निवडणूक स्वाभाविकपणे लक्षवेधी ठरली. समाजातील दीन-दुबळे, पददलितांचे तारणहार आपणच असल्याची प्रतिमा इंदिराजींनी सुरुवातीपासून जनसामान्यांवर ठसवण्यास सुरुवात केली होती आणि या निवडणुकीत तर त्यांनी 'गरिबी हटाव' अशी सर्वसमावेशक, समाजाच्या कोणत्याही घटकाला भावेल अशी घोषणा देऊन एकहाती निवडणूक जिंकली. पण नंतर जेमतेम तीन वर्षांत, देशातलं राजकीय वातावरण झपाट्याने बदलत गेलं. वयोवृद्ध सर्वोदयी नेते जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली विरोधाची धार वाढतच राहिल्याने २६ जून १९७५ रोजी इंदिराजींनी देशात आणीबाणी पुकारली. पण त्यातून कारभारावर पकड निर्माण होण्याऐवजी या काळात दुःशासनाने कळस गाठला. अखेर इंदिरा गांधींना सार्वत्रिक निवडणुकीचा मार्ग स्वीकारावा लागला. आणीबाणीच्या काळात तुरुंगामध्ये डांबलेल्या विरोधी पक्षाच्या नेत्यांना निवडणुकीसाठी १९७७ च्या जानेवारी महिन्यात सोडण्यात आलं. तुरुंगात एकत्र आलेल्या तत्कालीन जनसंघ आणि समाजवाद्यांसह सर्व विरोधी पक्षीयांनी बाहेर पडल्यानंतर 'जनता पक्षा'ची स्थापना केली आणि 'नांगरधारी शेतकरी' या चिन्हावर ते निवडणुकीला सामोरे गेले. या निवडणुकीत पक्षाच्या सामान्य उमेदवारांनीसुद्धा काँग्रेसच्या मातबर नेत्यांना धूळ चारली. सुमारे सहा वर्षांपूर्वी भारत-पाकिस्तान युद्धातील निर्णायक विजयामुळे लोकप्रियतेचं शिखर गाठलेल्या इंदिराजींनाही आयुष्यात प्रथमच पराभवाचा धक्का बसला. काँग्रेसचे बुजुर्ग नेते मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यानंतर प्रथमच केंद्रात बिगरकाँग्रेसचं सरकार सत्तेवर आलं. स्वतंत्र भारतातील आजवरच्या निवडणुकांपैकी सर्वात ऐतिहासिक अशा या निवडणुकीचं, अभूतपूर्व राजकीय उलथापालथीचं वर्णन त्या वेळी काही जणांनी 'देशाचं दुसरं स्वातंत्र्य' असं केलं होतं. कारण स्वातंत्र्यानंतर प्रथमच या देशातील सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक, कलाकार सत्ताधाऱ्यांच्या विरोधात निवडणूक प्रचारात उतरले होते. महाराष्ट्रात दुर्गाबाई भागवत, पु. ल. देशपांडे यांच्यासारख्या ख्यातनाम साहित्यिकांनी प्रचार सभा घेत महाराष्ट्र पिंजून काढला. अवघ्या सहा वर्षांपूर्वी लोकप्रियतेचा उच्च बिंदू गाठलेल्या इंदिराजींना जनतेच्या रुद्रावताराने घरी बसवलं. सध्याची समाज-माध्यमांसारखी संपकाची प्रभावी साधनं नसतानाही सबंध देशभरात जनतेने सत्ताधाऱ्यांच्या विरोधात एकमुखी संदेश दिला. संपूर्ण क्रांतीचा नारा देत सत्तेवर आलेल्या जनता पक्षातील वैचारिकदृष्ट्या भिन्न प्रकृतीच्या, सत्तालोलुप नेत्यांचं ऐक्य फार काळ टिकलं नाही. अल्पकाळात या सरकारविरुद्ध जनतेमध्ये नाराजी पसरायला लागली. जुलै १९७९ मध्ये हे सरकार कोसळलं. त्यानंतर निर्माण झालेली राजकीय अस्थिरता लक्षात घेऊन तत्कालीन राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डी यांनी लोकसभेची मध्यावधी निवडणूक जाहीर केली. मावळत्या सरकारने जनतेचा घोर अपेक्षाभंग केला होता. शिवाय, इंदिराजींविरुद्ध सूडापोटी केलेल्या कारवाईमुळे सुप्त सहानुभूतीही निर्माण झाली होती. त्यांनी या संधीचा अचूक फायदा उचलला आणि १९८० च्या जानेवारीत झालेल्या मध्यावधी निवडणुकीत पुन्हा एकदा घवघवीत यश संपादन केलं.

# 'जीएसटी'च्या ध्येयपूर्तीसाठी

सर्व वस्तू व सेवांवर एकसमान दराने करआकारणी करणाऱ्या देशांचा अनुभव आपल्यापुढे आहेच आणि आपल्या करविवादांचे, करचुकवेगिरीचे जीएसटी नंतरच्या काळातले नमुनेही आहेत. मग, जीएसटी क्रांती ची गोमटी फळे चाखण्यासाठी आपण तयार आहोत की नाही?

भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी १९९१ मध्ये- ते केंद्रीय अर्थमंत्री पदावर असताना- भारतीय अर्थकारणाच्या कायापालटाची मुहूर्तमेढ रोवली आणि या सुधारणांना आणखी सखोलता देण्याचे काम त्यानंतरचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांच्या सहकारी अर्थमंत्र्यांमार्फत केले. मग डॉ. सिंग यांनाच पंतप्रधानपद मिळाले आणि त्यांच्या या (२००४-१४) कारकीर्दीतही त्यांनी सुधारणा थांबवल्या नाहीत. हे दोघेही महान. पण मला भारत सरकारच्या सेवेतील माझ्या २५ वा ३० वर्षांच्या कार्यकाळात अधिक वेळा मार्गदर्शन मिळाले, ते डॉ. मनमोहन सिंग यांचे. राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य आणि अतुलनीय व्यावसायिक मूल्ये जपणारा प्रामाणिकपणा यांचा ध्रुवतारा म्हणजे डॉ. मनमोहन सिंग. त्यांनी घडवलेल्या संरचनात्मक बदलांमुळे भारत आर्थिक वाढीच्या मार्गावर आला आणि असेही म्हणता येईल की, वित्तीय सुधारणांमुळे या आर्थिक भरभराटीचा वेग वाढला. आपल्या लोकशाहीतील वित्तीय (अथवा अन्यही) धोरण ठरवण्याची जबाबदारी आणि अधिकार पंतप्रधानांकडे असतात, पंतप्रधानांनी तसेच त्यांचे अर्थमंत्री व मंत्रिमंडळातील अन्य सदस्य यांच्या सल्ल्यानुसार धोरण ठरवावे, अशी अपेक्षा असते. ही रीत मी ज्या वेळी कार्यरत होतो त्या वेळी पाळली जात होतीच पण आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याही काळात ती पाळली जाते आहे. पंतप्रधान पदावरील व्यक्तीचे मार्गदर्शन आणि त्यांचा पाठिंबा हे धोरणआखणीच्या प्रक्रियेत महत्त्वाचे आणि कळीचे असतेच. परंतु अर्थमंत्र्यांची अभ्यासू दृष्टी आणि या क्षेत्रातील त्यांची विद्वत्ता हे देखील वित्तीय सुधारणांसाठी अत्यंत आवश्यक ठरतात. आपल्या देशाला जसवंत सिंह, यशवंत सिन्हा, पी. चिदम्बरम आणि अरुण जेटली यांच्यासारखे अर्थमंत्री लाभले हे देशाचे भाग्यच, आणि मी केंद्रीय वित्त मंत्रालयात कार्यरत असताना मला या सर्वांबरोबर काम करण्याची संधी मिळाली, हा माझा बहुमानच. वित्तीय सुधारणांच्या या ऐतिहासिक कामगिरीचे स्मरण करताना मी आज विशेषतः आजच्या काळातील करसुधारणांबद्दल विस्ताराने विचार करणार आहे. जीएसटी अर्थात वस्तू व सेवा कर (गुड्स ॲण्ड सर्व्हिसेस टॅक्स) ही मोठी करसुधारणा आहे आणि तिला तिच्या नैसर्गिक ध्येयापर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे, या विश्वासातूनच मी हे विवेचन करतो आहे. काही सूचनांच्या अनुषंगाने माझे विवेचन मी मांडतो आहे.

तीन सूचना पहिली सूचना त्रिस्तरीय शासनव्यवस्थेचा तिसरा स्तर मानला जाणाऱ्या आणि ७३ व्या तसेच ७४ व्या घटनादुरुस्तीने सांविधानिक अधिष्ठान दिलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वाट्याबद्दल आहे. आपल्या देशात सर्वत्र शहरांचा विकास झपाट्याने होतो आहे. देशाची वेगवान आर्थिक वाढ, जलद रोजगारनिर्मिती आणि सशक्त तांत्रिक क्षमता यांसाठी या वाढत्या शहरांनी योगदान दिले तरच आपण बड्या जागतिक सत्तांशी स्पर्धा करू शकणार आहोत. शहरांच्या निकोप वाढीसाठी पायाभूत सुविधांची वाढीव आवश्यकता असतेच पण आरोग्य, शिक्षण, स्वच्छता यांसारख्या लोकसुविधांची किंवा पब्लिक गुड्स चीही भूक शहरांमध्ये अधिक असते. वस्तू व सेवा करातून मिळालेल्या रकमांचे समन्यायी वाटप जर या तिसऱ्या स्तरा ला झाले, तर आपल्या नागरी स्थानिक संस्थांचा - म्हणजे महापालिका आणि नगरपालिकांचा- वित्तीय पाया मजबूत होईलच आणि स्थानिक शासन-प्रशासनाला या निधीच्या विनियोगासाठी जो वाव मिळेल त्यातून आपली लोकशाही मुळापासून मजबूत होईल. कारण, सार्वजनिक निधीचा वापर सार्वजनिक हितासाठी कसा- कोणत्या प्रकारे करावा, हे स्थानिक पातळीवरच ठरवण्याची संधी यामुळे मिळणार असल्याने, लोकांच्या सूचनांना




महत्त्व मिळेल.

दुसरी सूचना वस्तू व सेवा करासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापण्याची. पहिल्या काही वर्षांत केंद्रीय वित्त मंत्रालयानेच वस्तू व सेवा कर यंत्रणेला सुरुवातीची पावले टाकण्यासाठी आधार दिला, त्यासाठी केंद्रीय महसूल सचिवांनीच वस्तू व सेवा कर सचिवालयाचे प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली, हा प्राथमिक प्रवासाचा टप्पा म्हणून समजून घेता येईल. पण या व्यवस्थेत आपले हक्क तत्त्वतः समान असूनही प्रत्यक्षात तसे होत नाही, अशी काही राज्यांची भावना बळावण्याचा संभव राहिला. वस्तू व सेवा कराची विद्यमान प्रशासकीय व्यवस्था ही राज्यांशी सहकार्य करताना किंवा राज्यांच्या सूचना ऐकताना तटस्थ आणि पूर्वग्रहरहित असावी, असे राज्यांना नेहमीच वाटत होते काय याविषयी प्रश्नचिन्ह कायम राहिले.

तिसरी सूचना वस्तू व सेवा कराच्या दर-संरचनेत सोपेपणा आणण्याची. पाच वर्षांआधीच्या काळात वस्तू व सेवा कराच्या दरांची रचना ठरवताना, कुणाचेही नव्या करामुळे महसुली नुकसान होऊ नये, अशा विचाराला प्राधान्य मिळाल्यामुळे महसूल-तटस्थता हीच या संरचनेसाठी त्या वेळी महत्त्वाची मानली गेली आणि तोवर जशी एकत्रित करआकारणी (उत्पादनशुल्क अधिक मूल्यवर्धित कर- अर्थात एक्साइज ड्युटी अधिक व्हॅट) होत होती, त्या गणनाचा प्रभाव तेव्हाच्या वस्तू-सेवा कर आकारणीवरही राहिला. मात्र याच्या परिणामी, आपल्याकडे एक नव्हे पाच निरनिराळे दर असलेली, गुंतागुंतीची संरचना वस्तू-सेवा करासाठी लागू झाली. आज त्या गुंतागुंतीचा आणि पाच दरांच्या जंजाळमुळे भारतीय वस्तू-सेवा कर व्यवस्था अतिजटिल होऊन बसली आहे.

आपण असे कशासाठी केले?

याचे कारण आपण महसूल-तटस्थता महत्त्वाची मानली; सुसूत्रीकरणासाठी अर्थसंकल्पीय तटस्थते ला जे महत्त्व देणे आवश्यक होते, ते आपण दिले नाही. आरएनआर (रेव्हेन्यू न्यूट्रल रेट) हा निकष मानण्याऐवजी विश्लेषकवृत्तीने आपण बीएनआर (बजेट न्यूट्रल रेट) पायाभूत मानला असता, तर उचित दराची वस्तू-सेवा कर आकारणी सहजशक्य आणि सोपीही झाली असती. आपण आरएनआर महत्त्वाचा मानला त्याला कारणे होती हे मान्य, पण अखेर वस्तू-सेवा कर संकलन हे अर्थसंकल्पातील केवळ महसुलाच्या बाजूवर नव्हे तर खर्चावरही परिणाम करणारे असते. त्यामुळे, महसूल-तटस्थता सूत्राचा अस्त कधी होणार आणि त्याजागी ह्य अर्थसंकल्पीय तटस्थते च्या उदयाला वाव कसा मिळणार, यासाठीची एक क्षितिजरेषा आपण आखून घेणेसुद्धा गरजेचे होते. मुद्दा वस्तू सेवा करामधील संरचनात्मक सुधारणा साध्य करण्याचा आहे- त्यासंदर्भात विषयांतर वाटेल पण एक उदाहरण सांगतो : आपण मोठा भांडवली खर्च करतो तेव्हा तेवढ्यापुरता ताण सहन करावा लागतो पण या भांडवली खर्चातून जी काही उभारणी होते तिच्यातून मिळणारी फळे रसाळ गोमटी च असतात की नाही? तसेच वस्तू-सेवा कराच्या संरचनेचे आहे. वस्तू व सेवा कराच्या सातत्यपूर्ण सुलभ-सोप्या आकारणीला काही काळ द्यावा लागेल, त्यानंतर अंतिमतः महसूल-तटस्थता येईलच, पण तिचीच अपेक्षा पहिल्या वर्षी करून फारसा उपयोग नाही. उलट उपद्रवाचा संभव अधिक, कारण कररचनेच्या बदलांना त्यामुळे पुरेसे प्रोत्साहन मिळतच नाही. वस्तू व सेवा करामुळे महसूल कमी झाला, तर त्या तुटीकडे आपण 'भविष्यकाळात सुसूत्र, सर्वमान्य आणि म्हणून यशस्वी अशा कररचनेसाठी सरकारने केलेली गुंतवणूक म्हणून पाहिले पाहिजे! बहुतेक साऱ्या प्रगत आणि प्रगतिशील अर्थव्यवस्थांमध्ये वस्तू व सेवा कराचा (किंवा युरोपात मूल्यवर्धित कराचा) एकच दर असतो. सर्वच्या सर्व वस्तू आणि सेवांसाठी कराचा एकसमान दर असणे सोपे आणि कायद्याच्या दृष्टीनेही सुलभ ठरते; त्यामुळे करमहसुलात वाढ आणि कमीत कमी करविवाद असा सुपरिणाम दिसतो आणि एकाच दराचा कर यशस्वी होतो.

जगभरचा अनुभव

कररचनेचा हा अनुभव इतका सार्वत्रिक आहे की, वस्तू व सेवा कर किंवा मूल्यवर्धित कराचा मार्ग ज्या- ज्या देशांनी निवडला, त्यांपैकी ८० टक्के देशांमध्ये एकसमान दरानेच सर्व वस्तू/ सेवांवर करआकारणी होते. असाच एकसमान दर भारतातही असावा, हे एक अपूर्ण ध्येय राहिले आहे. वास्तविक जीएसटीविषयी आपल्या देशात चर्चा जेव्हा सुरू झाली, तेव्हा १२ टक्के असा एकसमान दरच प्रस्तावित होता आणि तो १३ व्या वित्त आयोगानेच प्रस्तावित केलेला होता. जुन्या करपद्धतींत आवश्यक आणि चैनीच्या वस्तू/ सेवा असा भेद करून त्यानुसार निरनिराळ्या दरांनी करआकारणी होते, ही जटिल पद्धत बंद करणे हेच तर वस्तू व सेवा करा चे इंगित! एकसमान दराच्या करामधली सुसूत्रता आणि जिथे नाइलाज आहे तिथे कार्बन करा सारखे कर आकारण्याचे स्वातंत्र्य हाच तर वस्तू व सेवा करा मधला क्रांतिकारी भाग आहे. आपल्याला हरित ऊर्जाधारित आर्थिक वाढ हवी असेल, तर आपण हायड्रोकार्बन पदार्थांवर (पेट्रोल व डिझेलवर) वस्तू व सेवा करा च्या खेरीज वाढीव कर लावू शकतोच, पण त्यासाठी मुळात हे पदार्थ आधी एकसमान दराच्या करआकारणीत हवे. आज आपण कोणत्या वस्तू वा सेवांचे वर्गीकरण कुठल्या दराखाली करायचे, याचे खल करत बसतो; तो प्रकार बंद होऊन वस्तू व सेवा कर ही एक अत्यंत सुटसुटीत करपद्धती ठरेल. काही वस्तूंसाठी या कराचा दर आधीच्यापेक्षा कमी ठरेल, पण मग त्यामुळे हा कमी दराचा कर भरणाऱ्यांचे प्रमाण वाढेल - करचुकवेगिरी कमी होईल- आणि अंतिमतः महसूलवाढच होईल. आजघडीला जीएसटी घोटाळे उघडकीस आणले जाण्याचे प्रमाण मोठे आहे. यंत्रणांनी त्यांचे काम करणे चांगलेच; पण मुळात हे जीएसटी घोटाळे होणारच नाहीत अशा प्रवृत्तीची पेरणी जर आपल्याला एकसमान दराच्या जीएसटीतून करता येत असेल, तर करचुकवेगिरीचे कारणच उरणार नाही. सध्या काही वस्तू वा सेवांवर जीएसटीचे दर अधिक आहेत आणि म्हणून करचुकवेगिरीचे प्रकारही आहेत. याउलट सिंगापूर, न्यूझीलंड, संयुक्त अरब अमिराती, जपान यांसारख्या एकसमान दराचा वस्तू व सेवा कर आकारणाऱ्या देशांमध्ये करचुकवेगिरी कशी नगण्य आहे, याचा वस्तुपाठ आपल्यापुढे आहे. त्यामुळे आपल्याकडे जीएसटीचा एकसमान दर १२ टक्के इतका हवा आणि त्याचे वाटप सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश यांच्यात समन्यायीपणे व्हावयास हवे, याची सुरुवात आपण जितक्या लवकर करू तितके चांगले. अशी सुसूत्र, सोपी जीएसटी प्रणाली आपल्याकडील उत्पादक उद्योगांनाही प्रोत्साहनच देणारी ठरेल आणि मग, सध्या वस्त्रोद्योगासारख्या क्षेत्रांमध्ये आपल्याला जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांमुळे जशी आव्हाने सहन करावी लागतात, तसेही काही होण्याची शक्यता मावळेल. थोडक्यात, स्वतंत्र जीएसटी मंत्रालय (स्वायत्त जीएसटी परिषद), जीएसटीचा महसूल स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित करणे आणि जीएसटीचा अत्यंत सोपा असा एकसमान दर असलेली संरचना हे आपल्या जीएसटी क्रांतीला तिच्या नैसर्गिक ध्येयाकडे नेणारे ठरेल.

# निवडणुकीतील उमेदवारांवर महाराष्ट्र अंनिसने केली कारवाईची मागणी



**पुणे, प्रतिनिधी :**

सध्या देशात लोकसभा निवडणुकांचे वातावरण आहे. या दरम्यान काही उमेदवार हे प्रतिस्पर्धी उमेदवार आणि मतदारांवर दबाव निर्माण करण्यासाठी अंधश्रद्धेचे प्रकार करतात. निवडणुकीत अंधश्रद्धेचा वापर करून मतदारांच्या मनात दहशत निर्माण करणे हा गुन्हा आहे तसेच आदर्श आचारसंहितेचा भंग आहे. असे अघोरी प्रकार करणाऱ्यांवर पोलीस प्रशासनाने जादूटोणाविरोधी कायद्यानुसार कायदेशीर कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केली. निवडणूक काळात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे अशा अनेक तक्रारी येतात. निवडणूक काळात मतदारांवर दबाव टाकण्यासाठी अंधश्रद्धेचे प्रकार आढळल्यास संपर्क करण्याचे आवाहन डॉ. हमीद दाभोलकर, प्रशांत पोतदार, वंदना माने, दीपक माने, भगवान रणदिवे, शंकर कणसे, हौसेराव धुमाळ, सुकुमार मंडपे, प्रमोदिनी मंडपे यांनी केले. मतदारांच्या मनात अंधश्रद्धेची भीती निर्माण करणाऱ्या या प्रकारांमध्ये नारळावर हात ठेवून विशिष्ट व्यक्तीला मत देण्याची शपथ घ्यायला लावणे, देवाचा भंडारा-अंगारा उचलून मत देण्यासाठी शपथ घ्यायला लावणे, जवळच्या प्रसिद्ध देवस्थानावर मतदारांना घेऊन जाऊन पुजाऱ्याकडून शपथ घ्यायला लावणे, मांत्रिक-तांत्रिकांना गावामध्ये बोलावून महिला मतदारांवर दबाव निर्माण करणे, धर्मगुरूंना बोलावून मतदारांवर प्रभाव टाकणे, विरोधी उमेदवाराच्या अंगणात काळी बाहुली, लिंबू मिरची, नारळ याचा उतारा टाकणे. विरोधी उमेदवारावर तथाकथित काळी जादू-करणीचा प्रकार करणे असे निखळ अंधश्रद्धेचे अनेक प्रकार सध्या निवडणूक काळात घडत आहेत. मतदारांवर दबाव टाकण्यात येत असल्याने हे प्रकार आदर्श निवडणूक आचारसंहितेचा भंग करणारे आहेत, तसेच जादूटोणा विरोधी कायद्यानुसार असे प्रकार करून दहशत निर्माण करणे हा गुन्हा असल्याचे प्रसिद्धिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# वाहकांअभावी टीएमटीच्या ताफ्यातील ९४ बस आगारात पडून



**ठाणे, प्रतिनिधी :**

टीएमटीच्या ताफ्यातील जुन्या ९४ बस वाहक उपलब्ध नसल्याने आगारात खितपत पडल्याचे समोर आले आहे. यातील १७ बस भंगारात गेल्या असल्याची कबुली टीएमटी प्रशासनाने दिली आहे. ठाणे महापालिकेच्या परिवहन उपक्रमाने मागील वर्षी २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता ४२७ कोटी १९ लाख रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला होता. तर २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता ७१८ कोटी ७४ लाख इतक्या अर्थसंकल्पाला ठाणे मनपा प्रशासनाने मंजुरी दिली. यात पहिल्या टप्प्यात २६० कोटी अनुदानाची तरतुद पालिकेने केली आहे. टीएमटीच्या ताफ्यात सद्यस्थितीत एकुण ५४६ बस असून यातील ९४ जुन्या बस टीएमटीच्या मालकीच्या तर, ११५ एसी, ११० स्टँडर्ड, ९० मिडी बस, 'जेएनयूआरएम'मधील नवीन आणि जुन्या ४५ बस, ५० महिला तेजस्विनी बस अशा एकूण ४१० बस भाडेतत्त्वावर आहेत. मागील काही काळात टीएमटीमधील अनेक कायम कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यामुळे, वाहकांचा तुटवडा भासत असून वाहक उपलब्ध नसल्याने ९४ जुन्या बस आगारात खितपत पडल्या आहेत. यातील १७ बस उभ्या उभ्याच भंगारात जमा झाल्या आहेत. ठाणे परिवहन सेवेचे चाक आधीच खोलात आहे. त्यातून सावरण्यासाठी ठाणे परिवहन सेवेकडून विविध उपाययोजना आखल्या जात असताना ठाणे पालिका क्षेत्रातील ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत, तर महिलांना प्रवासात ५० टक्के सूट देण्यात येत असल्याने उत्पन्नात प्रतीवर्षी १८ कोटींचा फटका बसत आहे. ही सूट लागू होण्यापूर्वी ठाणे परिवहन सेवेचे दिवसाचे उत्पन्न ३० ते ३१ लाखांच्या आसपास होते, ते निम्म्यावर आले आहे.

# Four booked for duping Thane man of Rs 10.8 cr in business deal

**THANE**

The police in Maharashtra's Thane city have registered a case against four persons for allegedly cheating a government contractor of more than Rs 10.8 crore by fabricating documents for a business deal, an official said on Monday, A first information report has been registered under sections 406 (criminal breach of trust), 420 (cheating) and other relevant provisions of the Indian Penal Code against a couple who were directors of two companies and two others, an official from Shrinagar police station said. The Thane man has alleged that the accused couple wished to sell their electrical goods manufacturing units in Andheri MIDC and Palghar and showed all relevant documents to




him.

He also visited the manufacturing units, he said, The Thane man paid Rs 5.82 crore to purchase the two plants, and he examined the document a few days later and found that they were fake, the official said. The accused allegedly did not present the original documents and refused to transfer the shares to the complainant's name, the official said, adding that the accused couple also allegedly shut their office in Thane, The complainant was duped of Rs 10.8 crore, which included the amount he paid to buy the factories and earnings from his investments in the units, he said.

In another case, police have arrested a 30-year-old man after seizing banned tobacco products valued at Rs 5.06 lakh from him on the Mumbai-Ahmedabad highway in Maharashtra's Palghar district, an official said on Monday, reported PTI. During a nakabandi (security blockade) in view of the upcoming Lok Sabha elections, the police on Saturday evening spotted a car proceeding from Umbargaon towards Mumbai on the highway and stopped it on the basis of suspicion. During checking, the police found tobacco products of different brands kept in gunny bags in the vehicle and seized them, a police spokesperson said. The car occupant, resident of Dahanu in Palghar, was arrested and booked under relevant provisions of the Indian Penal Code and the Food and Drug Administration regulations, the police added. The sale and consumption of gutka, scented and flavoured tobacco has been banned in Maharashtra since 2012.

# Highest IPL team scores: SRH record 287/3 vs RCB, register second-biggest T20 total

**BENGALURU**

The IPL 2024 season is witnessing unprecedented hitting from teams that are pushing the team scores consistently past 200. Sunrisers Hyderabad broke their own record for the highest IPL total with a sensational 287 for three against Royal Challengers Bengaluru on April 15, 2024. SRH's total is also the second-highest T20 cricket, only behind Nepal's 314/3 against Mongolia in 2023. SRH previously smashed 277/3 against Mumbai Indians in a match that recorded the highest T20 aggregate and the most sixes ever in a match. Kolkata Knight Riders later came close with a blistering 272 for seven against Delhi Capitals in Visakhapatnam. Royal Challengers Bengaluru and Lucknow Super Giants are the only other teams to record 250-plus totals in the IPL. RCB held the record for over 10 years, having posted 263 runs against Pune Warriors India in Bengaluru in 2013 on the back of Chris Gayle's record 175 not out. SRH are threatening to raise the bar with another onslaught against RCB at the M. Chinnaswamy Stadium in Bengaluru. The Orange Army crossed 150 runs in only the 12th over on the back of Travis Head's 39-ball century. The onslaught continued despite Head's dismissal with Heinrich Klaasen and Aiden Markram leading the side past 200



in 15 overs.

**Highest team scores in IPL history :**

- SRH 287/3 vs RCB in 2024
- SRH 277/3 vs MI in 2024
- KKR 272/7 vs DC in 2024
- RCB 263/5 vs PWI in 2013
- LSG 256/5 vs PBKS in 2023
- RCB 248/3 vs GL in 2016
- CSK 246/5 vs RR in 2010
- MI 246/5 vs SRH in 2024
- KKR 245/6 vs KXIP in 2018
- CSK 240/5 vs KXIP in 2008
- CSK 235/4 vs KKR in 2023

# Lok Sabha elections 2024: 1.46 lakh seizures made for violation of election code



**MUMBAI**

Following the implementation of the Model Code of Conduct in the Lok Sabha constituencies of Mumbai Suburban District, 1,45,863 seizures have been made in four Lok sabha Constituencies for violating the election code, implemented by the Election Commission of India. "A total of 92,294 seizures have been made in government properties, 35,048 in public properties, and 18,485 in private properties for literature confiscation," said Rajendra Kshirsagar, district collector, Mumbai Suburban District. However, when this reporter called the Mumbai city district election office (collector office), the official failed to provide data related to the seizures, actions taken against violators and the number of squads formed to keep a check on the situation. "After the implementation of the code, instructions have been given to start a thorough inspection in the district and expedite the process of seizure against those violating the code. No leniency will be shown towards those breaking the code during the election period. To ensure this pathaks (squads) have been formed," said a spokesperson from the Mumbai suburban district collector office. He added that the district election officer had formed units comprising 165 Bharaari Pathak (flying squads) and 177 static surveillance teams along with "government machinery that has been actively monitoring the situation". Meanwhile, Kshirsagar asserted, "Under no circumstances will illegal transportation, liquor smuggling, and unidentified vehicle hauling be allowed, and all authorities have been instructed to remain vigilant." According to Kshirsagar, 43 checkposts have been fortified with "full manpower" including police personnel to conduct thorough inspections of vehicles coming through. "Also, no one is allowed to publish any material under any name or pseudonym related to the elections.

